# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price Rs. 3/-

# संवाद

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥

॥ स्वयमेव मृगेंद्रता ॥

Vol.-1 Issue - 9 मार्च २००९ March 2009


**Pune Zonal Sub-Centre**

Please read the Notice of Pune Zonal Sub-centre's Annual General Meeting printed on Page No.2. Please note that no separate Notice of the AGM will be sent to the members.

**पुणे झोनल सब्-सेंटरच्या सभासदांसाठी विशेष सूचना**

पान क्र.२ वर पुणे झोनल सब्-सेंटरच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस छापली आहे. या सभेची वेगळी नोटीस सभासदांना पाठवली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

## j संपादकीय

मित्रांनो,

फेब्रुवारी २००९ च्या 'संवाद' च्या अंकात 'महागाईभत्त्यातील वाढ' यासंबंधीची बातमी वाचून सर्वांना आनंद नक्कीच मिळाला असणार. आपल्या आयुष्यात आनंदाचे क्षण फार कमी प्रमाणात आले तरी त्यांचा पाठलाग करायचा नसतो. आरशाचा हलता कवडसा कधी हाताला सापडतो का ? दु:खाचे तसे नसते. ते फार लोचट असते. तुम्ही कितीही झिडकारले तरी ते तुमचा पिच्छा सोडणार नाही. म्हणून जेव्हा जेव्हा आनंदाचे क्षण आपल्या वाट्याला येतील तेव्हा त्याचा पुरेपूर आनंद आपण लुटायला हवा. असे क्षण जीवनात आपल्याला बरंच काही देऊन जातात. आपले जीवन सुसह्य करण्यास ते क्षण मदत करतात.

ईश्वराने आपणास मनुष्य जन्म दिला म्हणून खरे तर आपण त्याचे आभारच मानले पाहिजेत. 'हसत जगावे, हसत मरावे हे तर माझे गाणे', 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'जीवनात ही घडी अशीच राहू दे', 'हे जीवन सुंदर आहे' या काव्यपंक्ती जीवन आनंदात जगा, हेच सूचित करतात ना ? आनंदी जीवन जगायचे तर प्रथम शरीर सांभाळा. आपला गाडा सुरळीत चालावा असं वाटत असेल तर ते संपूर्णत: शरीरावरच अवलंबून असते. त्याची काळजी जर घेतली नाही तर आपल्या मनात असणाऱ्या अनेक गोष्टी फक्त शरीर साथ देत नाही म्हणून आपण करू शकणार नाही. 'जुनं देऊन नवीन घ्या' हे शरीराच्या बाबतीत लागू पडत नाही. शरीर एकच आहे त्याला 'रिप्लेसमेंट' नाही. त्यामुळे त्याची काळजी नीट घेतलीच पाहिजे. अधिक काळ आणि चांगल्या पद्धतीने शरीराने आपल्याला साथ द्यावी असं जर वाटत असेल तर शरीर सांभाळायलाच पाहिजे. चांगलं जगणं ही एक कला आहे. म्हणूनच जगता आलं पाहिजे. आणि जगता यायला लागलं की कसं जगायचं हेही आपोआप समजायला लागतं. केस पांढरे झाले म्हणजेच माणूस अनुभवी आणि संपन्न आयुष्य भरपूर जगला, असं नाही. आयुष्यातील वर्ष वाढली म्हणजे माणसाचे फक्त शारीरिक वय वाढलं म्हणजे तो मोठा होतोच असं नाही. चेहऱ्यावरचे तारुण्य, सुरकुत्यांमध्ये बदललं असलं तरी अंगातला उत्साह जोवर शाबूत आहे तोवर मनावर आणि आत्म्यावर सुरकुत्या चढत नाहीत. जी माणसं मनानं तरुण असतात, त्याचं सगळं लक्ष त्यांच्या भविष्यावर खिळून असतं. मागे काय घडलं ते उगाळत बसून अश्रू गाळत बसण्यात त्यांना अजिबात रस नसतो. त्यांची सर्व ऊर्जा भरभरून जगण्यासाठी असते आणि अशी माणसं कधीच म्हातारी होत नाहीत. त्यांची शरीरं थकली तरी मनाचा तजेला अबाधित असतो.

आपलं जीवन, आपलं आयुष्य हा एक मोठा रंगमंच आहे आणि आपण या रंगमंचावर काम करणारे लहान मोठे कलाकार आहोत. आपल्या नियतीने आपली जी काही भूमिका ठरवलेली असते त्याप्रमाणे आपण वागत असतो. आपल्या प्रत्येकाची भूमिका संपून 'एक्झिट' घ्यावीच लागणार आहे आणि जिथून आपण आलो त्या पालनकर्त्याकडे आपली पुन्हा रवानगी होणार आहे. त्यावेळी ऐकू येईल तो मनातील आतला आवाज. त्यावेळी आपल्या बरोबर असेल ते आपले सुप्त मन... शांतता. ही शांतता सुखकारक असेल का ? ती सुखकारक असणे हे सर्वस्वी आपल्यावरच अवलंबून आहे ना? प्रत्येक क्षण हा क्षणार्धात भूतकाळात जमा होतो. गेलेल्या क्षणाचा पाठलाग करण्यापेक्षा येणाऱ्या क्षणाची प्रतीक्षा करून त्याचा आनंद लुटायला आपण नेहमीच सज्ज असायला हवं ! थोडक्यात -

''दु:ख पीडा-क्लेश अपुले, या जगी मांडू नये ।
काळ थोडा तोही सरता, वावगे भांडू नये ॥
प्राशुनी घ्यावे पुरेपूर रंग, रस अन् गंधही ।
जन्म अपुला अर्धाच प्याला, तो तरी सांडू नये ॥''

**- प्रभाकर गुपचूप, पुणे**

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल),पुणे

# पुणे झोनल सब्-सेंटर

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

दि.१९ मार्च २००९ रोजी झालेल्या पुणे झोनल सब्-सेंटरच्या कार्यकारिणीच्या सभेमध्ये ठरविल्याप्रमाणे आपल्या पुणे झोनल सब्-सेंटरमधील (म्हणजेच पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, नाशिक, सातारा, सोलापूर व सांगली जिल्ह्यातील) सर्व सभासदांना कळविण्यात येते कीं, **पुणे झोनल सब्-सेंटरची वार्षिक सर्वसाधारण सभा, बुधवार दि.२२ एप्रिल २००९ रोजी 'भरत नाट्य मंदिर', सदाशिव पेठ, पुणे-३० येथे सायंकाळी ठीक ५ वाजता आयोजित केली आहे.** या सभेत खालील कामकाज होईल.

१) मागील ९ मे २००८ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर ज्या सभासदांचे निधन झाले त्यांना श्रद्धांजली वाहणे.
२) मागील ९ मे २००८ च्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे. हा वृत्तांत जून २००८ च्या संवाद मध्ये प्रसिद्ध केला आहे.
३) मा.चिटणीसांचे वार्षिक अहवाल वाचन.
४) ९ मे २००८ च्या पुणे झोनल सब-सेंटरच्या वार्षिक सभेनंतरच्या वर्षभरात (म्हणजे १०-५-०८ ते २२-४-०९ या काळात) ज्या सभासदांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केलीत अशा ज्येष्ठ सभासदांचा सत्कार. (अशा सभासदांना वैयक्तिक निमंत्रण पत्रे पाठवली आहेत.)
५) असोसिएशनच्या सद्य घडामोडींविषयी वृत्तांत कथन.
६) अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा.

तरी पुणे झोनल सब-सेंटर मधील सर्व सभासदांनी या वार्षिक सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

चंद्रकांत कुलकर्णी
चिटणीस

**टीप :** सभेच्या कामकाजानंतर **स्टेट बँक पेन्शनर्स स्नेह मंडळा** तर्फे सांस्कृतिक कार्यक्रम त्याच ठिकाणी भरत नाट्य मंदिर मध्ये आयोजित केला आहे. त्याचा आस्वाद घ्यावा ही विनंती.

************

## स्टेट बँक पेन्शनर्स स्नेहमंडळ, पुणे
## सांस्कृतिक कार्यक्रम

आपल्या स्नेह मंडळातर्फे प्रा. प्रकाश जोग यांचा जुन्या हिंदी चित्रपट गीतांचा 'दृक-श्राव्य' रसग्रहण (Audio-Visual) हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी सर्व सभासदांनी या कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे.

तारीख - बुधवार दि. २२ एप्रिल २००९
स्थळ - भरत नाट्य मंदिर, सदाशिव पेठ, पुणे ३०
वेळ - संध्याकाळी ६ वाजता.

ज्या सभासदांनी या वर्षीची वर्गणी दिली नसेल त्यांनी ती त्वरित द्यावी ही विनंती. वर्गणी स्वीकारण्याची व्यवस्था सभागृहावर करण्यात आली आहे.
(टीप :- पुणे झोनल सब सेंटरची वार्षिक सभा या सभागृहात सायंकाळी ५ वाजता आहे. ती सभा संपल्यावर वरील कार्यक्रम सुरू करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.)

सेक्रेटरी
स्टेट बँक पेन्शनर्स स्नेहमंडळ, पुणे

आदि शंकराचार्य स्थापित **चारधाम यात्रा..**
अर्थात.. पूर्व/पश्चिम/दक्षिण/उत्तर या हिन्दूस्तानच्या चार दिशेला स्थापित चारधाम दर्शन यात्रा
**जगन्नाथपूरी/व्दारका/रामेश्वर/बद्रिनाथ**
**दि.२४ जून ते ७ जुलै** फक्त १४ दिवसात **महापरिक्रमा**
संपूर्ण रेल्वेप्रवास
**सहल खर्च रुपये :१३७५०/-**
अधिक रेल्वे भाडे
यात्रेची सर्व माहिती व सविस्तर कार्यक्रम उपलब्ध
नोंदणी व अधिक माहिती करीता संपर्क
आयोजक: राजेश रानडे.
अनोळखी जगाची ओळख
TOURWAYS
022 65 281 281
92232 73496
C-305 Palm Acres.M.P.Rd,Mulund east Mumbai 81

# State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune
# Mumbai Zonal Sub-centre

Minutes of the 22nd Annual General Meeting held at Shivaji Mandir (Natyagruh), Dadar (W), Mumbai-400028 on Wednesday the 18th February 2009

The Meeting began at 12.00 noon. Shri P.A. Lopes, who was on the stage extended a warm welcome to everyone present in the auditorium. He thereafter requested the following dignitaries to come on the dais and occupy their chairs.

| | | |
|---|---|---|
| Shri V.M. Gokhale | – | President, Mumbai Zonal Sub-centre |
| Shri S.B. Gokhale | – | Principal Secretary, Mumbai Zonal Sub-centre |
| Shri B.G. Dandekar | – | Former President, Advisor of Federation of SBIPA and the Chief Guest of the Meeting |
| Shri P.P.S. Murthy | – | General Secretary, Federation of SBIPA |
| Shri R. Nagarajan | – | President, SBIPA, Chennai Circle |
| Shri R.N. Lalingkar | – | Secretary, SBIPA, Mumbai Circle |
| Shri P.M. Narkar | – | President, SBIPA, Panaji Zonal Sub-centre |

After the dignitories had occupied their seats the meeting continued with recital of Ganesh Vandana/Guru Vandana and Vande Mataram.

Shri Lopes then requested Shri S.B. Gokhale, to felicitate the dignitaries with a bouquet of flowers.

Messages wishing a grand success to the Meeting received from Sarvashri B.K. Ghose, V.K. Mehrotra and B.R. Gadre and many others were read out.

After these initial proceedings Shri Lopes declared that the Meeting would continue as per Agenda of the Meeting.

**Agenda No.1 : To condole the death of Bank's Pensioners/Family Pensioners/Associate Members whose names have been reported to us after 22nd February 2008.**

After Shri Lopes read out the names of the deceased members. The house stood in silence for two minutes to pay respect to the departed souls.

**Agenda No.2 : To confirm the minutes of the Annual General Meeting held on the 22nd February 2008**

As there were no querries/suggestions on the minutes they were treated as confirmed.

After this, instead of taking up Agenda item No. 3, the Felicitation of Senior members who have completed 75 years of age it was decided to complete the discussion on Agenda item No. 4

**Agenda item No. 4 : Committee's Report for the year 2008 to be read, discussed and adopted**

Since there were no querries on the Report it was treated to have been accepted and adopted.

At this juncture i.e. around 12.40 p.m. the Bank's officials had arrived and hence it was decided to hold the Bank's Meet.

Shri Lopes requested the following dignitaries from CC/LHO/ZO to come on the dais

| | |
|---|---|
| Shri Rajeev Lal | – Dy. General Manager and CDO, Mumbai LHO |
| Shri Ajit Salvi | – AGM, PPG, Mumbai LHO |
| Shri V. Vishwanathan | – Manager, ZO |

| | |
|---|---|
| Shri Ravi Maldikar | – CMHR II Z O |
| Shri Raymond D'Souza | – Manager,Z O |
| Smt. Dr. Ajinkya | – Chief Medical Officer, C C |
| Shri J.N. Das | – Chief Manager PPG Dept. C C Mumbai |

Shri V.M. Gokhale, President, SBIPA, Mumbai Circle and Mumbai Zonal Sub-centre welcomed all the dignitaries from Corporate Centre, LHO and ZO. He mentioned that SBIPA Mumbai Zonal Sub-centre always received full co-operation from CC/LHO/ZO had no complaint to offer. However he appealed to the authorities to look into the following.

a) In 2001 in case of VRS Retirees, Professional Tax was deducted from the Ex-gratia amount paid to them. This was done only at two branches – BEST Depot, Kurla and Opera House. This was in violation of Bank's instructions when the SBIPA Mumbai took up the matter with the controlling authorities of these branches, except assurances nothing happened. Eventually after a hectic follow-up BEST Depot, Kurla branch refunded the amounts to the concerned employees. However Opera House branch is still avoiding the refund for some unknown reasons. Shri.V.M.Gokhale requested Shri Rajeev Lal to focus his attention on the problem and solve it at the earliest.

b) Corporate Centre have issued instructions to all LHOs to hold Structured Meetings with the respective Pensioners' Associations and in fact the ball was set rolling by the Chairman on the 18th January 2008, when he held a Structured Meeting with the representatives of the Federation of SBI Pensioners' Associations. However it is now understood that out of 14 Circles only 8 Circles have held such Meetings. It is surprising that a prominent Circle like Mumbai Circle is yet to hold a Structured Meeting with the SBIPA Mumbai, Shri V.M. Gokhale requested Shri Rajeev Lal to make efforts for such Meeting.

After Bank's dignitaries were felicitated by Shri S.B. Gokhale by offering them bouquet of flowers, Shri Ravi Maldikar, CM, H.R. Mumbai LHO was requested to take charge of the Meeting.

Shri Maldikar while expressing his pleasure to be in group of Seniors who had served the Bank with full devotion also felt surprised to see the group very active and keen to work. He had a special mention of Shri S.M. Dharadhar, who was showing great enthusiasm even at the age well beyond 70 years.

Shri Maldikar announced that proposals for opening of dispensaries at Goregaon and Vasai had been sent to Corporate Centre with proper recommendations.

He then requested Shri Rajeev Lal, DGM and CDO, Mumbai LHO to inaugurate the Bank's session with his speech.

Shri Rajeev Lal, in his speech made a mention of his returning to pensioners' gathering after about 3 years. He said that the then existing problems like Family Pension, and some others have been sorted out. He thought that since Mumbai and Pune have a large population of SBI Pensioners, many complaints are being received from them and every attempt is being made to solve them. In respect of the Professional Tax matter of Opera House Branch, he expressed surprise and said that this was not referred to him earlier. He assured the house to solve the issue.

Speaking about Structured Meeting he mentioned that they are meeting informally on many occasions and such meetings are more important. He also said that any Pensioner can come up with their problem any time and he and his team would be everready to solve it.

Shri Lal there after brought the attention of the gathering to appointment of Brand Ambassadors by many Private Banks. SBI however does not need such appointment since their 90,000 strong pensioners' community is their best Ambassadors. He appealed to the pensioners to live up to the Bank's expectation and work as Bank's Ambassador. He further said that the Bank was making big strides in business and in fact had gone far ahead of the other competitors. He thought everyone should help in the Bank's progress.

Shri Ajit Salvi, AGM, PPG LHO, then spoke. He said that the schedule of centralized payment of Pension has now stabilized and there are no complaints on this issue. He appealed to the Pensioners to do the following meticulously.

a) Submission of Life Certificate in November every year.
b) Submission of investment plans.

Shri Salvi also explained that the work related to payment of FPA to 8th Bipartite retirees had been completed and will be released shortly. So also the payment of revised Family Pension with arrears could also be effected in a month or two since the proposals are being put up for sanction to Corporate Centre.

Shri J.N. Das, from PPG CO also spoke at the meeting

Shri Ravi Maldikar then declared an open session and called for suggestions from the members present at the meeting.

Shri R. Narasimhan, suggested that the Medical benefit card be issued like a Credit Card, so that its use could be very easy.

Shri Dinesh Kamat spoke on the occasion about computerized Medical report.

Shri P.A. Lopes thanked the dignitaries from ZO/LHO/CC for attending meet and then declared the Bank's Meet is over. A break for snacks was taken. The meeting began after the break for snacks at about 2.30 p.m. Agenda No. 5 was taken up

**Agenda No. 5 : To discuss recent developments**

Shri P.P.S. Murthy, newly elected General Secretary of the Federation of SBIPA was requested to inform the members on the recent developments.

Shri Murthy expressed happiness and said that it was his first meeting after his being elected as General Secretary of the Federation.

Shri Murthy then explained to the members the latest development during his visit to New Delhi. He said that he met several officials of Government of India, Ministry of Finance, including Shri Arun Ramnathan, Chief Secretary, in that Ministry. He said that he had explained to them our outstanding issues particularly the injustice meted out to 7th Bipartite retirees. He said that the Government of India had rejected Bank's proposal for no specific reasons. While on the Madras High Court Case in which an order was passed in favour of the 7th Bipartite retirees. He said that he had talked to Shri Arun Ranmathan and requested him to implement the judgement, however some Government officials have been very adamant and they are prejudiced. They maintain that the SBI employees are enjoying 3 benefits. This has resulted in Government of India going in appeal against the Madras High Court order.

Shri Murthy continued saying that despite heavy odds from Government of India the Federation's efforts would continue. Federation would also seek the support of Both the WSF. The Federation also would move IBA. Speaking about Bank he thought the Bank had the resources but no will to implement e.g. Revision of REMBS.

He concluded appealing to the gathering to support the efforts of the Federation.

Shri R. Nagarajan, President, SBIPA Chennai Circle, while speaking on recent developments explained the efforts made by Sarvashri B.G. Dandekar and PPS Murthy. He expressed disappointment since the Government of India did not move an inch due to the advice of some of their officials whose mind had been totally vitiated against us. In the circumstances we have to wait till the retirement of these officials and new Government. However our efforts by way of Dharna/Fast etc. should continue.

Shri Nagarajan also narrated the efforts made through some M.Ps in Tamil Nadu which also had not succeeded. He stressed the need for a co-operation with WSF.

After this Agenda No. 3 was taken up

**Agenda No. 3 : To honour senior members who have completed / will complete 75 years of age between the 22nd February 2008 and the 18th February 2009 (both days inclusive)**

Out of 65 eligible recipients only 26 were present. They were all felicitated by offering them Shawl, Coconut and Sweets.

**Agenda No. 7 : Speech of the President**

Shri V.M. Gokhale while delivering his presidential speech said that during the last year the Pensioners' movement had witnessed two historical events.

1) Sit in Dharna by the Pensioners to protest against the Bank's and Government of India's attitude in solving their long outstanding issues. In Mumbai nearly 650 to 700 Pensioners participated and nearly 70-80 were lady pensioners. This was a unique incident. However Shri Gokhale thought that in future if required at last 1000 pensioners should attend similar action. He thanked the participants particularly the lady members who had responded to Association call in big number.
2) Shri B.G. Dandekar, as President of the Federation of SBIPA met the senior officials of the Ministry of Finance, Government of India not once but thrice. Though nothing tangible has yet emerged a fact remains that in the past no such meetings were ever held. Shri Gokhale further said that the officials concerned were explained in detail about our problems and they are now convinced that issues require to be resolved urgently. We have to wait to see the outcome. Shri Gokhale, complimented Shri B.G. Dandekar. This was possible to him by calling him as Encyclopedia on the SBI Pension and Pensioners' issues. Shri Gokhale agreed with Shri R. Nagarajan's views on co-ordination with WSF. In Mumbai such co-ordination is very much in existence and assured our cordial relations will continue.

Referring to the Delhi High Court case Shri Gokhale thought that it was a very strong case and hopefully it will go in our favour. However we were to keep our fingers crossed. Moreover Government of India may go in appeal.

Making an important announcement Shri Gokhale declared that following the example of Shri Dandekar, who has resigned as President of the Federation of SBIPA, Shri Gokhale was quitting as President of the Mumbai Zonal Sub-centre. He thereafter declared the following changes which were approved by the Zonal committee till next election.

Shri S.B. Gokhale would work as the President of Mumbai Zonal Sub-centre.
Shri R.S. Rajiwadekar would work as the Principal Secretary of Mumbai Zonal Sub-centre
Shri S.M. Dharadhar would work as the Vice-President, Mumbai Zonal Sub-centre
Shri P.S. Uchgaonkar would work as the Organising Secretary, Mumbai Zonal Sub-centre
Shri B.P. Khare would work as Secretary, Mumbai Zonal Sub-Centre

**Agenda No. 6 : Speech of the Chief Guest**

Shri B.G. Dandekar, associated with the SBI Pensioners movement for the past 22 years and former President of the Federation of SBIPA was and now advisor to the Federation, was the Chief Guest of the Meeting. He was then requested to speak a few words.

Shri Dandekar, began by saying that Sarvashri PPS Murthy, R. Nagarajan and V.M. Gokhale, have already talked and explained the various happenings in our struggle for justice and he therefore had nothing more to add on the subject. Shri Dandekar, narrated to the audience his age problems. In fact he was not able to see/read anything. He thanked Sarvashri V.M. Gokhale, S.B. Gokhale, B.P. Khare and J.B. Pusalkar for rendering help to him during the period when he has undergone Cornea replacement operation. He however, mentioned that during that period of virtual darkness before him he realized the importance of eyes and elaborated his efforts in re-gaining the eyesight by implanting the Cornea donated by someone. The operation was conducted at Hyderabad where such Cornea are available in good numbers, which are very rarely available in Mumbai or elsewhere in Maharashtra. He, therefore, appealed to all the members to donate their organs like eyes, liver, kidneys etc. after death. This would bring joy in someone's life and would fulfill our duty to the mankind.

Deliberating on the issues of the pensioners he said that through the medium of the Federation efforts on all fronts were made but success is still away from us. However there are hopes and we should not give up our struggle.

**Agenda No. 8 : Any other business with the permission of the chair**

Since no issue was raised there was no discussion under this item.

Shri S.W. Agarkar offered vote of thanks and thereafter the Meeting concluded with the National Anthem sung by everyone.

**S.B.Gokhale**
Principal Secretary, Mumbai Zonal Sub-Centre

## कौतुकमिश्रित अभिनंदन

आपले कोल्हापूर येथील ज्येष्ठ कार्यकर्ते श्री.बाळासाहेब दैनी यांची नात व श्री.समीर दैनी यांची ७ वर्षांची मुलगी कु.सलोनी हिला 'कलर्स दूरदर्शन' वाहिनीच्या 'छोटे-मियाँ' या (Stand-up Commedy) कार्यक्रमात तिच्या सर्वोत्कृष्ट परफॉर्मन्स बद्दल रू.१५ लाखांचे पहिले बक्षिस मिळाले. याबद्दल तिचे असोसिएशनतर्फे कौतुकमिश्रित हार्दिक अभिनंदन ! ज्यांनी ज्यांनी ह्या कार्यक्रमातील तिचा विविध भूमिकेतील परफॉर्मन्स पाहिला असेल त्यांना निश्चितच तिचे कौतुक करावेसे वाटले असेल.

**She is a little wonder !** सलोनी इयत्ता तिसरीत असून, इतक्या लहान वयातील तिच्या प्रतिभेला सलाम व तिच्या भावी उज्ज्वल आयुष्यासाठी मनापासून शुभेच्छा!!

**- सेक्रेटरी**

(श्री.दैनी - मोबाईल : **9850976912**)

## आजतक

**सहावा वेतन आयोग मंजूर-**
**सरकारी कर्मचाऱ्यांना पगारवाढ व**
**निवृत्तांना थकबाबी मिळणार.**



**तरी मी माझ्या बाबांना पहिल्यापासून सांगत होते की मला साधा मराठी शाळेतला मास्तर चालेल पण बँकेतला कर्मचारी नको.**

**- मधुकर पालकर,** पुणे

# आठवणीतील 'बी.एन्.'

बुधवार दि.११ मार्च २००९, वेळ सकाळी ७.३० ची. टेलीफोनची लाँग रिंग ऐकू आली आणि काळजात धस्स झालं. का कुणास ठाऊक, पण ही एस.टी.डी.ची लाँग रिंग वाजली की फोन उचलतांना माझा हात उगीचच थरथरतो. आजही तसंच झालं. फोन नागपूरहून माझ्या मुलाचा होता. 'बाबा, आपले भालूकाका गेले हो आज पहाटे ५.३० वाजता'- मुलगा म्हणाला. मुलांचे भालूकाका म्हणजे आपणां सर्वांच्या परिचयाचे आणि काहीजणांच्या घनिष्ठ संबंधातील श्री.भालचंद्र नारायण ऊर्फ 'बी.एन्.जोशी'. क्षणभर कानावर विश्वासच बसेना, कसं शक्य होतं हे ? माझ्या तोंडून शब्दच फुटेना. फोनचा रिसिव्हर हातातून गळून पडला. माझी पत्नी धावत माझ्या जवळ आली आणि काय झाले म्हणून विचारू लागली. माझ्या हृदयाचे ठोके वाढू लागले होते आणि घसा कोरडा पडला होता. कोणत्या शब्दात मी तिला ही घटना सांगणार होतो? सौ. घाबरून गेली व म्हणाली 'अहो, सांगा ना काय झालं?' दु:खाचा आवेग ओसरल्यावर मी पुटपुटलो, 'आपले बी.एन्. गेले.' आता धक्का बसण्याची वेळ तिची होती.

१५ मार्च १९५५ हा दिवस मला अजूनही आठवतो. कारण त्या दिवशी माझी व श्री.भालचंद्र जोशींची ओळख झाली. त्यावेळी आम्ही व जोशी बंधू अहमदनगरला एकाच वाड्यात रहात होतो. त्यांच्या स्वभावामुळे ओळखीचे रूपांतर दाट मैत्रीत व्हायला फारसा वेळ लागला नाही. ८ सप्टेंबर १९३८ रोजी त्यांचा जन्म पानाची-देवळाली (जिल्हा-बीड) येथे झाला. त्यांचे वडील नारायणशास्त्री प्रकांड पंडित होते. त्यामुळे जोशी घराण्याची प्रखर बुद्धिमत्ता व तीव्र स्मरणशक्ती ते जन्मत:च आपल्याबरोबर घेऊन आले होते. त्यात माता-पित्यांकडून झालेल्या संस्कारांची भर पडल्यावर एक अलौकिक असे व्यक्तिमत्त्व तयार झाले, त्याचेच नांव भालचंद्र नारायण ऊर्फ बी.एन्. जोशी.

१९५७ साली प्रथम ते प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून २० रूपये पगारावर काम करीत होते. एक मेरिट असलेली व्यक्ती, संधीच्या अभावी खेड्यात खितपत पडलीय हा विचार मला स्वस्थ बसू देईना आणि म्हणून मार्च १९५७ मध्ये चाळीसगाव शाखेचे तत्कालीन शाखाधिकारी श्री.एम.के.आर.चारी यांना त्यांच्याबद्दल सविस्तर माहिती सांगितल्यावर चारीसाहेबांनी त्यांच्या मेरिटचा विचार करून तत्काळ कॅश डिपार्टमेंटमध्ये त्यांना लावून घेतले. कॅश डिपार्टमेंटचे काम संपल्यावर घरी न जाता, अकाउंटस् डिपार्टमेंटमधे रोज जाऊन तेथलेही काम त्यांनी स्वत:हून शिकून घेतले. पुढे CAIIB चे दोनही पार्ट पूर्ण करून ग्रॅज्युएशनही पूर्ण केले. त्यामुळे ते ट्रेनी ऑफिसर म्हणून लगेचच प्रमोट झाले यात कांहीच नवल नव्हते.

बी.एन्. जोशी हे एक प्रसन्न व सदैव हसतमुख असे व्यक्तिमत्त्व होते. अंशकालीन कर्मचाऱ्यापासून सर्वांना तत्परतेने मदत करण्याचा त्यांचा स्वभाव होता. ते एक कर्तव्यदक्ष अधिकारी तर होतेच पण बँकेच्या ग्राहकांप्रती देखील त्यांनी नेहमीच सेवावृत्ती बाळगली. बँकेच्या सेवेत असतांना त्यांनी Branch Manager, Lead Bank Officer, Development Manager (Agri), Mumbai LHO, A.O.(Advances), AGM, STC, AGM, Regional Office अशा विविध हुद्द्यांवर काम केले. त्यांनी ज्या ज्या ठिकाणी काम केले, त्या त्या ठिकाणी आपली एक अमीट अशी छाप सोडली. त्यांच्या अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वामुळे ते जसे सहकर्मचारी-अधिकाऱ्यांमधे लोकप्रिय होते, तसेच ते वरिष्ठ अधिकाऱ्यांचेही आवडते झाले होते. अशा या अनुशासनप्रिय, कार्यकुशल व प्रामाणिक व्यक्तीला आज काळाने आपल्यापासून दूर ओढून नेले आहे. जन्माला आलेला एक दिवस जाणारच हे कितीही खरे असले तरी जेव्हा आपल्या एखाद्या घनिष्ठ मित्राच्या बाबतीत

असे घडते तेव्हा मात्र ती गोष्ट मनाला चटका लावून जाते. परमेश्वर बी.एन्.जोशींच्या आत्म्याला शांती देईलच. पण त्याचबरोबर त्यांच्या कुटुंबियांना व आपणां सर्वांना हे दु:ख सहन करण्यासाठी लागणारे धैर्य देवो हीच या दु:खद प्रसंगी सहभागी होतांना मी प्रार्थना करतो.

।। ॐ शांति: शांति: शांति: ।।

राम चांदोरकर, औरंगाबाद

(M-9324168353)

# युनिट वार्ता

**नाशिक युनिट -** संघटनेच्या नासिक शाखेच्या सदस्यांसाठी 'स्नेह मेळावा व तिळगूळ' समारंभ दि. २८ जाने.२००९ रोजी शहरापासून दूर निसर्गाच्या सान्निध्यात 'जवाहरलाल नेहरू स्मृती उद्यान' या ठिकाणी आयोजित केला होता. या मेळाव्याचे प्रायोजकत्व भारतीय स्टेट बँक पंचवटी शाखेने स्वीकारून निवृत्त सहकाऱ्यांशी संवाद साधण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

श्री रघुनाथ विसपुते यांनी उपस्थितांचे स्वागत केल्यावर पी.एस.जोशी यांच्या प्रार्थनेने कार्यक्रमास सुरूवात झाली. मागील मेळाव्यानंतर दिवंगत झालेले सहकारी श्री.मुकुंद महाबळ सदस्याचे कुटुंबीय, भारताचे माजी राष्ट्रपती श्री.वेंकटरमण आणि २६.११.२००८ रोजीच्या दहशतवाद्यांच्या हल्यात कर्तव्य पार पाडताना धारातीर्थी पडलेले अधिकारी, जवान व निष्पाप नागरिक यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

ऑगस्ट २००८ नंतर नव्याने सदस्य झालेल्या सभासदांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे मालेगाव, लासलगाव, येवला, निफाड येथील नव्याने सदस्य झालेले सभासद आवर्जून उपस्थित राहिले होते. स्नेह मेळाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे नासिक शाखेचे आधारवड ज्येष्ठ/श्रेष्ठ प्रवर्तक सदस्य आप्पा सटवे, तसेच एक अभ्यासू पत्रकार लेखक समीक्षक व्यक्तिमत्त्व श्री. शरदचंद्र चौधरी व श्री. नलिन मुझुमदार यांचा 'अमृतमहोत्सव' सन्मान सोहळा. नासिक शाखेच्या वतीने या त्रयींचा सत्कार करण्यात आला. सत्कारार्थींचा रोचक परिचय श्री. मधू रानडे व श्री. आप्पा सटवे यांनी करून दिला. श्री. एम. डी. दलाल व श्री. डी.व्ही. कानिटकर यांचे हस्ते श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन तिघांनाही दीर्घायुष्य चिंतून शुभेच्छा देण्यात आल्या.

मेळाव्यानिमित्त डॉ.सौ.साधना गोखले सहसदस्य यांनी 'श्री समर्थ रामदास स्वामी आणि दासबोध' या विषयावर फारच प्रासादिक विवेचन केले. सर्व उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डॉ.सौ.गोखले यांनी 'कालिदासांच्या सप्तकलाकृती' या पुस्तकाचे प्रकाशन मागील वर्षी केले. युनिटने आपल्याच सहसदस्यांच्या सुप्त गुणांची योग्य ती दखल घेऊन परस्पर स्नेह वाढवीत ठेवण्यातही सातत्य ठेवले.

श्री. दलाल, श्री. कानिटकर, श्री. सुतार, श्री. धरणगावकर आदि ज्येष्ठ सदस्यांनी सर्व सभासदांना 'तीळगूळ' देऊन शुभेच्छा दिल्या.

भोजनोत्तर दुसऱ्या सत्रात सदस्यांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम फारच रंगला. श्री. रघुनाथ महाबळ यांच्या सुरेल बासरी वादनाने सुरुवात झाली. नंतर कविता वाचन, स्फुट कथन, मधून मधून मधू रानडे यांचे हलके फुलके विनोद हास्याची कारंजी उडवीत होते. सौ. व श्री. जोशी यांच्या काव्यवाचनास उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. सौ.महाबळ यांचे मार्मिक विवेचन, श्री. प्रकाश देशमुख व श्री. जे.बी.मोरे यांची शायरी दाद देवून गेली.

स्नेह मेळाव्यास नासिक कार्यालयाचे स.महाप्रबंधक श्री. सतीश पटवर्धन यांचे मार्गदर्शन अपेक्षित होते. परंतु कार्यबाहुल्यामुळे स्वत: उपस्थित राहू न शकल्यामुळे त्यांचे विचार सदस्यांना ऐकता आले नाहीत. परंतु क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी श्री.फाळके (Chief Manager-Rural RACPC) हे आवर्जून उपस्थित राहिले. त्यांनी उपस्थितांना संबोधित केले व शुभेच्छा दिल्या. प्रायोजक श्री.सोनार शाखाधिकारी यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना निवृत्त सहकाऱ्यांशी संवाद साधताना खूप आनंद होत आहे असे नमूद केले व त्यासाठी असोसिएशनला धन्यवाद दिले व सर्व सदस्यांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संपूर्ण कार्यक्रमाचे जेथे आयोजन केले होते ते 'स्मृतीवन' नक्षत्र उद्यान वनविभागाचे अधिपत्याखाली विकसित केले आहे. तेथील वनपाल श्री.तांबेकर यांनी उद्यानाच्या प्रकल्पाची अभ्यासपूर्ण व उद्बोधक माहिती देऊन तेथे विकसित केलेल्या 'वनौषधी उद्याना'विषयी व निसर्गाच्या किमयेबद्दल विवेचन केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री.रघुनाथ विसपुते यांनी श्री.पी.एस.जोशी यांच्या साथीने केले, तर श्री.श्याम भणगे यांनी आभार प्रदर्शन केले. सुमारे दिडशे सदस्यांच्या उपस्थितीत पसायदानानंतर सायंकाळी ५ वाजता कार्यक्रमाची इतिश्री झाली.

मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वश्री दिनू बच्छाव, भास्करराव गायकवाड, विनोद शुक्ल, सोनार, गुंजाळ, परांजपे, डॉ.तोरणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**- वामन बेळे,** सेक्रेटरी (नाशिक)

************************

**अमरावती युनिट -** स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशनच्या अमरावती युनिटचे स्नेहसंमेलन दि. २५ फेब्रुवारी ०९ ला संपन्न झाले. स्नेहसंमेलनाला असोसिएशनच्या नागपूर झोनल सबसेंटरचे अध्यक्ष श्रीकांत देसाई व सचिव जयंत वकील उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. सभासदांच्या स्मृतींना उजळा देणारे तसेच विविध कार्यक्रमांद्वारे ज्ञान, प्रबोधन, मनोरंजन व सहभोजनाचा आनंद लुटण्यासाठीच संमेलनाचे आयोजन केलेले असते.

यावर्षीसुद्धा अमरावतीतील प्रसिद्ध पॅथालॉजिस्ट आणि कीर्तनकार डॉ.विनोद कोलवाडकरांचे प्रवचन ठेवण्यात आले होते. खरे म्हणजे स्नेहसंमेलनात प्रवचन हे अनोखे व धाडसाचेच पाऊल. पण डॉक्टरांनी आपल्या अध्यात्मप्रतिभेने भक्तिमार्ग फुलवीत नेला. संत तुकोबारायांच्या 'भक्त ऐसे जाणा । जे देही उदास....'' या अभंगाचा आधार घेत जणू उपस्थितांना ऐहिक मायापाश सोडून दीन-दुबळ्यांच्या सेवेद्वारे भगवंताच्या निकट जाण्याचा मार्गच दाखविला. यानंतर वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ सभासदांचे शाल, श्रीफळ देऊन अभीष्टचिंतन करण्यात

आले. श्री.प्रभाकर डी.पांडे आणि श्रीमती कुमुद भोंगाडे यांचा सत्कार श्री.देसाई यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी श्री.पांडे यांनी असोसिएशनला रू. १००१/- ची देणगी दिली.

द्वितीय सत्रात विदर्भातील प्रसिद्ध वऱ्हाडी कवी व साहित्यिक श्री. शंकर बडे यांनी विनोदी कविता व कथाकथनद्वारे दुसरे पुष्प गुंफले. त्यांच्या 'असा हा वऱ्हाडी मानूस' या शीर्षकाखाली इरसाल परंतु तितकाच मनाचा निर्मळ असलेला वऱ्हाडी माणूस त्यांच्या वेगवेगळ्या साहित्यिक मानसपुत्रांद्वारे सादर केला. शहरी माणसांची संस्कृतीच्या नावाखाली असलेली दुटप्पी वागणूक, रीतिभाती व त्याला शह देणारी बेरकी पण रोखठोक भाषेतील खेडुतांची उत्तरे देणारे प्रसंग खळखळून हास्याद्वारे दाद देणारे ठरले. त्यांच्या 'नागो बुढा पूरात वाहून गेला' आणि 'हिरव्या पिकात डोलारे, डोई आभाळ झेलारे' ह्या कविता हास्याचे धबधबे आणि त्यालाच कारुण्याची किनार देणारे ठरले.

एकंदरीतच डॉ.कोलवाडकरांच्या प्रवचनी पुरणपोळीनंतर हा वऱ्हाडी ठेचा उपस्थितांना चांगलाच भावला. आभार प्रदर्शनानंतर स्नेहभोजन होऊन स्नेहसंमेलनाचे समापन झाले. संमेलनस्थळाचे रम्य वातावरण, आठवणींना उजाळा, वक्त्यांच्या प्रतिभेची आतिषबाजी आणि स्वादिष्ट भोजनामुळे पुढील वर्षी या संमेलनातच भेटण्याची एकमेकांना खात्री देत सभासद वर्ग आपल्या निवासी परतले. या कार्यक्रमाच्या आयोजनात अध्यक्ष रामचंद्र साठे, सचिव श्रीकृष्ण देशमुख, अनंत लेंघे, नरेंद्र चांडक आणि कार्यकारिणी सभासद यांचा मोलाचा वाटा आहे. श्री.इंगोलीकरांचे निवदेन व श्री. रवी बागडे यांचे आभारप्रदर्शन उत्कृष्ट ठरले.

– **श्रीकृष्ण देशमुख,** सचिव (अमरावती)

## प्रश्नचिन्ह !

प्रश्नचिन्ह ! अेक भलं मोठं !!
कविता स्फुरते कशी ? सुचते कशी ?
गेला बाजार होते कशी ?
चौकात मी उभा, दिशा शोधत, निरीक्षण, अंदाज
एक एक परिमाण अजमावून पाहात ।
जमेल का कविता ?
केशवसुतांच्या घरातील वास्तव्याने ?
कुसुमाग्रज उद्यानातील, काव्य-शिल्प वाचल्याने ?
सुचेल का कविता माळा घालून 'झेंडूच्या फुलां'च्या ?
की 'मै कहि कवि ना बन जाऊ
तेरे प्यार में अै कविता ?'
असे म्हणत म्हणत
कुणाच्या प्रेमात पडून
सहज स्फुरेल कविता !

– **नी.व.ओढेकर,** नासिक

## अभिनंदनीय

⁕ सोलापूर येथील आपले एक सदस्य श्री.अरविंद श्रीधर पुजारी यांना दै.लोकसत्ता यांनी घेतलेल्या 'साहित्यिक प्रश्नमंजुषे'त ललित लेखन, कथा कादंबरी, प्रवासवर्णन, आत्मचरित्र, समीक्षालेख अशा सर्वंकष साहित्य प्रकारांवरील १२ प्रश्नांची अचूक उत्तरे दिल्याबद्दल 'महावाचक' अशी पदवी आणि एक हजाराचे प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले त्याबद्दल श्री.पुजारी यांचे असोसिएशनतर्फे मन:पूर्वक अभिनंदन ! श्री.पुजारी यांना गेली अनेक वर्षे मराठी व इंग्रजी वाचनाचा छंद आहे व त्यांचे चतुरस्र वाचन त्यांना वरील सन्मान मिळविण्यास उपयुक्त ठरले. त्यांच्याकडे स्वत: विकत घेतलेल्या १५०० च्या वर पुस्तकांचा संग्रह आहे हे विशेष. असे छंदच आपल्याला आपल्या जगण्याच्या जाणीवा विस्तारित करून आपले आयुष्य सर्वार्थाने समृद्ध करीत असतात.

⁕ सोलापूर येथील आपले आणखी एक सभासद बंधू श्री.मोहम्मद हुसेन अकबर हुसेन शेख, सेवानिवृत्त मेसेंजर, यांची दोन्ही मुले - सफदर हुसेन व अन्वर हुसेन - यांनी 'चार्टर्ड अकौंटंट' ही पदवी मिळवून आपल्या वडिलांचे स्वप्न साकार केले आहे. त्याबद्दल त्यांचे आपल्या असोसिएशनतर्फे अभिनंदन व कौतुक करताना विशेष आनंद होत आहे. त्यांचे सर्व कुटुंबीय एकत्र रहातात हे विशेष. त्यांच्या आनंदात आम्हीही सहभागी आहोत.

- सेक्रेटरी

## सभासदांना आवाहन

आपल्यामधील सुप्त लेखनगुणांना शब्दरूप द्या आणि आपली लेखनकृती 'संवाद'कडे पाठवा. लेखन स्वरचित असावे. शब्दमर्यादा ८०० ते १०००. अक्षर सुवाच्य असावे. पांढऱ्या कागदाच्या एकाच बाजूस पुरेसा समास सोडून पूर्ण नाव, पत्ता, सभासद क्रमांक, दूरध्वनी क्रमांक लिहून लेखन पाठवावे. इंग्रजी, मराठी वा हिंदी कुठल्याही भाषेतील साहित्याचे स्वागत होईल.

– संपादक, 'संवाद'

## कचरा व्यवस्थापन

शहरातील घनकचरा समस्या ही नजीकच्या काळात व्यवस्थापनाच्या पूर्ण हाताबाहेर जाणार आहे. आधुनिक जीवनशैलीत प्लॅस्टिक व इतर अजैविक कचऱ्याचे प्रमाण भरमसाठ वाढत आहे. परंतु त्याची विल्हेवाट व्यवस्थित रीतीने लावण्याकरिता मात्र फारच थोडा विचार केला जात आहे. एकट्या मुंबई शहरात आज दर दिवशी ७००० मेट्रीक टनाच्या वर कचरा निर्माण होत आहे. तो आता मुलुंड, देवनार येथील डम्पींग ग्राऊंडवर टाकला जात आहे. एवढ्या लांब कचरा वाहून नेण्याकरिता तो एकत्र (जैविक व अजैविक) टाकल्यामुळे त्याच्या पुढील व्यवस्थापनाकरिता कोट्यवधी रूपये महापालिका खर्च करीत आहे. तरीही कचऱ्याचे व्यवस्थापन अतिशय अनैसर्गिक पद्धतीने होत असल्यामुळे प्रदूषणाच्या व पर्यायाने आरोग्याच्या भयंकर समस्या निर्माण होत आहेत. थोडक्यात, महापालिका तात्पुरती उपाययोजना करून आजचे मरण उद्यावर ढकलत आहे. वेळीच उपाययोजना झाली नाही तर हे मरण फार लांब नाही. नजीकच्या काळात हा कचऱ्याचा भस्मासूर मुंबईला गिळंकृत केल्यावाचून राहणार नाही. थोड्याफार फरकाने सर्वच शहरांची ही स्थिती आहे.

म्हणूनच कचरा जेथे निर्माण होतो तेथेच जैविक, अजैविक व विषारी अशा रीतीने वर्गीकरण करणे बंधनकारक असल्याचा 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा'चा कायदा महापालिकेने अतिशय प्रभावीपणे राबविण्याची वेळ आली आहे. त्याकरिता खालील काही मुद्दे विचारात घेता येतील -

१) जैविक कचरा जेथे मोठ्या प्रमाणात निर्माण होतो. उदा. भाजीबाजार, हॉटेल, मॉल, कंपनीच्या मोठ्या खानावळी, फळांचे रस व उसाच्या रसाची दुकाने ह्यांच्याकरिता कंपोस्टिंगची सुविधा.

२) कचरा वर्गीकरण करून ठेवण्याच्या अस्तित्वात असलेल्या कायद्याबद्दल विविध माध्यमांद्वारे जनजागृती व कायदा मोडणाऱ्यांवर योग्य कारवाई. त्याकरिता आवश्यक ती यंत्रणा व प्रशिक्षित नोकरवर्ग.

३) मोठ्या गृहनिर्माण संस्थांना खत प्रकल्पाकरिता जागा ठेवणे बंधनकारक.

४) स्थानिक पातळीवर महापालिका अधिकारी, खाजगी व सरकारी शाळांतील शिक्षक, पर्यावरणावर काम करणाऱ्या सामाजिक संस्था व स्वतंत्रपणे ह्या क्षेत्रात काम करणारे नागरिक, पर्यावरणावर अभ्यास करून प्रकल्प करणारे कॉलेज युवक अशा लोकांच्या प्रतिनिधींची एखादी समिती नेमून कचरा व्यवस्थापनाच्या कामावर देखरेखही ठेवता येईल.

५) महापालिकेने पुढाकार घेऊन भाजीपाला बाजारात तसेच मोठ्या गृहनिर्माण संस्थात प्रायोगिक तत्त्वावर कचरा व्यवस्थापन सुरू करावे.

कचरा वर्गीकरण करून व्यवस्थापन करण्यावर पैसा खर्च झाला तरी हे व्यवस्थापन हे नैसर्गिक तत्त्वांनी झाल्यामुळे शाश्वत (Sustainable) राहणार आहे. प्रशासनाने व जनतेने वेळीच सावध व्हावे. लोकांनी कचरा (ओला व सुका) वेगळा करून ठेवला तरी पर्यावरण राखण्याला खूप मोठी मदत होणार आहे. कारण पुढचे व्यवस्थापन कठीण नाही.

मी स्वत: सोसायटीत गेली ७-८ वर्षे छोटासा खतप्रकल्प राबवीत आहे. त्यावरून सांगते की प्रत्येक गृहनिर्माण संस्थेला कचरा वेगळा गोळा करणे व जैविक कचऱ्याचे खतात रूपांतर करणे कठीण नाही. परंतु ह्याकरिता जनजागृती, लोकांचा सहभाग व कायद्याची अंमलबजावणी ह्या सर्वांची आवश्यकता आहे.

**- जयश्री जोशी**, मुंबई.
दूरध्वनी - ०२२-२८८७०२७१

## अभिनंदनीय

आपल्या असोसिएशनचे एक सभासद श्री.के.डी. जहागीरदार यांची नात कु.संपदा हिला २००८-२००९ मध्ये चंद्रपूर येथे आयोजित केलेल्या ३४ व्या 'राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शना'त तृतीय क्रमांक मिळाला. या यशाबद्दल असोसिएशनतर्फे कु. संपदा हिचे अभिनंदन.

**- सेक्रेटरी**

मध्यम वर्गीयांसाठी डिलक्स, इकॉनॉमी सहली
राजगुरू टूर्स
जिव्हाळा जपणारी माणसं

| टूर | पॅकेज | कंडक्टेड |
|---|---|---|
| सिमला-मनाली-चंदीगड | 6,975/- | 11,975/- |
| नैनीताल-कौसानी-कार्बेट | 6,475/- | 10,975/- |
| हैद्राबाद-श्रीशैल्य-रामोजी | 4,475/- | 5,425/- |
| बंगलोर-म्हैसूर-ऊटी | 5,975/- | 8,975/- |
| कोकणदर्शन-आंबोलीसह | 4,475/- | 5,475/- |
| काश्मिर Cost Saver | 7,975/- | 8,975/- |
| काश्मिर-वैष्णोदेवी Std. | 9,975/- | 14,975/- |
| चारधाम | - | 15,875/- |
| दार्जिलींग-सिक्किम-गंगटोक पेलींग, लांचुग-यामतुंगसह | 9,975/- | 13,975/- + Railway |

नेपाळ • सिंगापूर-बँकॉक • मॉरीशस • श्रीलंका
स्टेट बँक स्टाफ व पेन्शनर्सना रू.५००/-प्रत्येकी सवलत
संपर्क : राजन पाडलोसकर - 9322231216
मुंबई : 022 - 2431 8082 / 2438 1026
ठाणे : 022-25406361 पुणे : 9822949289

# चूक कोणाची ?

बदली झाली होती. गाव लहान. बँकेच्या भाषेत 'रूरल ब्रँच' होती. दोन वर्ष जाणं भाग होतं. दोन वर्षांनी तरी सुटका होईल याची खात्री नव्हती. पण इलाज नव्हता.

बस स्टँड बऱ्यापैकी होता. म्हणजे दोन-तीन गाड्या उभ्या होत्या. एक सुटत होती. हालचाल होती. स्टँडच्या दारात हॉटेल. आठ-दहा बाकडी. दारात गलेलठ्ठ मालक गल्ल्यावर बसलेला. त्याच्या जवळच्या भिंतीवर ठळक अक्षरात 'इथे सर्व धर्माच्या, जातीच्या... वगैरे !' त्याच्या खाली 'उपीट, डोसा, मिसळ................'

दर माफक होते. आत शिरलो.

'या साहेब.'

बँकेचे साहेब बदलले की लहान गावात लगेच कळतं.

'आमचा चहा पिऊन तर बघा. रोज याल चहा प्यायला. खास चव आहे.'

मालकानं स्वत:चा कप आणून दिला. दोन-तीन पोरं कामाला होती. एक हातातलं फडकं बेसीनमध्ये पिळत होता. एक भिंतीला पाय लावून नुसताच उभा होता. कोपऱ्यातल्या टेबलावर एक पोरगं पेपर वाचत बसलं होतं.

पुढच्या आठवड्यात जॉईन झालो. गावात फक्त मांसाहारी जेवणाची सोय होती. मला हातानं स्वयंपाक करणं भाग होतं. पण इथला डोसा आणि उपीट छान होतं. अधूनमधून ते खाऊन भागवता आलं असतं.

आणि मग रोजच तिथे चहाला यायला लागलो. मालकाशी दोस्ती झाली. मलाही गावातली सगळ्या तऱ्हेची माहिती मिळायला लागली. पोरं पण ओळखायला लागली. तन्मयतेनं पेपर वाचणाऱ्या मुलाचं मला नवल वाटत होतं.

'ह्यो एकटाच सगळे पेपर वाचून काढतोय बघा. मला तर वेळच होत नाही.'

माझी उत्सुकता बघून मालक बोलला. मी मग पोराशी दोस्ती वाढवली.

'शिकत नाहीस का रे ? सिद्धू नाव ना तुझं ?'

'जमत नाही. नववीत गेलो आणि आई-बाप दोघंही मरून गेले. अजून एक बहीण आहे. माझ्यापेक्षा दोन वर्षांनी लहान. तिला घातलंय शाळेत.'

अरे वा. स्वत:ची शाळा बंद करून बहिणीला शिकवतोय.

एकदम डोक्यात काय आलं माझ्या ! एक सणक आल्यासारखी झाली.

'तू पण जा ना शाळेत. तुझा पुस्तके, वह्या, कपड्यांचा खर्च मी करीन. फी तर तुला नसणारच. बारावी तरी पुरी कर.'

तो खुलला. जरा वेळच. लगेच चेहरा पडला.

'पण इथली ड्यूटी ?'

तिथे रात्रीची शाळा नव्हती. दिवसभर शाळेत जावं लागणार होतं. मग मालकाला बोललो. सिद्धूची 'ड्यूटी' बदलायला लावली. पहाटे पाच ते दहा आणि संध्याकाळी सहा ते नऊपर्यंत त्यानं काम करायचं ठरलं.

त्याची शाळा सुरू झाली.

अडीच वर्ष अशीच गेली. सिद्धू खुश होता. कपडे जास्त स्वच्छ व्हायला लागले होते. केसांना तेल, कंगवा लागत होता.

परत बदली झाली. घराजवळच्या शाखेत. अर्थातच 'रूरल' ब्रँचचा विसर पडला. तीन-चार वर्ष गेली.

आणखी एक ब्रँच झाली.

एक दिवस वरून फर्मान आलं. 'रूरल' ब्रँचची रोकड तपासणी करा. बँकेच्या भाषेत 'कॅश व्हेरिफिकेशन' !

एका आठवड्यात रिपोर्ट पाठवायचा होता. दुसऱ्या दिवशी निघालो.

स्टँडवर उतरलो. जुन्या आठवणींनी एकदम घेरलं. गाव वाढलं होतं. स्टँडमध्ये दोन-तीन प्लॅटफॉर्म वाढलेले दिसत होते. वर्दळ वाढली होती. पाय नेमके हॉटेलकडे वळले. मालक आणखीनच फुगला होता. जरा निरखून पाहिल्यावर या साहेब म्हणाला, 'काय मालक, काय म्हणतोय धंदा ?'

'बरा चाललाय. आणखी दोन हॉटेलं सुरू झालेत. वडा पावाच्या गाड्या पण झाल्यात.'

'सिद्धू काय म्हणतोय ?' मी उत्सुकतेनं विचारलं.

मालकानं रोखून माझ्याकडे बघितलं. त्याचा चेहरा रागीट, उग्र झाला होता.

'साहेब, तुम्ही त्याचं वाईट केलंत. त्याच्या आयुष्याचं नुकसान झालं.'

माझा चहाचा कप तसाच राहिला.

एवढा मोठ्ठा आरोप !

'तुम्ही त्याला शाळेत पाठवला आणि काय झालं ? त्याला इथे फडकं मारायची लाज वाटायला लागली. गिऱ्हाइकावर ओरडायला लागला. मधून मधून दांड्या मारायला लागला.'

'बारावी तर झाली. पण नोकरी कोण देणार ?'

'फार कटकट व्हायला लागली तशी मी त्याला कामावरून काढला.'

'अरे बापरे !' माझ्या तोंडून बाहेर पडलं.

'मग आता काय करतो ?'

'करतो काय ? गावभर फिरतो. कधी स्टँडवर हमाली करतो. कधी एखाद्या किराणा दुकानात. पण कुठेच टिकत नाही. फार शहाणा झाल्यासारखं झालंय त्याला. टेबल खुर्ची हवी. कोण देणार?'

'आणि त्याची बहीण ?'

'काय सांगू साहेब. तिचं तर मातेरं झालंय. वयात आलेली मुलगी. गावात टगे काय कमी आहेत ?'

मी सुन्न झालो. माझ्या चांगुलपणाला एवढं भयानक फळ आलं होतं.

चहाचा कप तसाच टाकून उठलो. पैसे द्यायला लागलो.

'नको साहेब. तुम्हाला चहा गोड लागला नाही.'

मी त्याच्याकडे एकदा पाह्यलं आणि नजर वळवली.

'साहेब, तुम्ही जर त्याला शाळेत पाठवला नसता तर अजूनपर्यंत स्वत: चार टेबलांचं हॉटेल मी त्याला काढून दिलं असतं. आज जी दोन हॉटेलं आणि वडापावची गाडी दिसते ना ती माझ्याकडचीच पोरं आहेत. मी पगार देत नाही पण दहा वर्षांनी भांडवल देऊन धंदा चालू करून देतो.'

खरं होतं त्याचं. सिद्धू कमवायला लागला असता. एव्हाना बहिणीचं लग्न करून दिलं असतं. ती संसाराला लागली असती. त्या ऐवजी हे काय झालं ?

मला अपराध्यासारखं वाटायला लागलं. ब्रँचमध्ये गेलो. चार-पाच तासात काम आटोपून स्टँडवर आलो. माझं चित्त थाऱ्यावर नव्हतं. समोरून बस आली. माझं लक्ष गेलं नाही. कचकन् ब्रेक लागले. ड्रायव्हर रागानं बघत होता. जेमतेम वाचलो होतो.

बसमध्ये चढलो. 'कुठे जायचं साहेब ?'

'सांगलीला.'

'उतरा खाली. बस कोल्हापूरला निघाली आहे.'

'ठीक आहे. एक कोल्हापूर द्या.'

कंडक्टरनं निरखून बघितलं. पण काही बोलला नाही. तिकीट फाडलं.

सगळ्यात मागच्या आडव्या सीटवर कोपऱ्यात बसलो. समोरच्या दांडीवर डोकं टेकलं.

मी चूक केली का ? की सिद्धू चुकला ? हॉटेल मालक चुकला ? की आणखी कोणी ? चूक कोणाची ?

**- चिंतामणी ना. गोखले,**
कुपवाड, सांगली - ४१६४१६.

## j क्षेम

तुझिया भेटीने, आनंदले मन
जाहले दर्शन, देवत्वाचे !
कळेना कसे मी, करावे कौतुक
भासले प्रतीक, पावित्र्याचे !
वाटतसे सार्थ, जाहले जीवन
माझे आशास्थान, आहेस तू !
निवास भलेही, असू देत दूर
नसावे अंतर, मनामध्ये !
मधुर वाणीने, होतसे आनंद
वर्णावया शब्द, सापडेना !
वाटतसे तुझी, सदा व्हावी भेट
दु:खाचे सावट, दूर होई !
नसो कधी चिंता, असो सदा क्षेम
कृपा करो श्रीराम, तुझ्यावरी !

**- सुभाष शं. सरदेशमुख,**
बी-३ पंचवटी विहार, ६९ रामाचा गोट, सातारा-२

# प्रतिक्रिया

जानेवारी २००९ चा संवाद संपूर्ण वाचला. प्रथम श्रीधर सहस्रबुद्धे यांच्या संपादकीय लेखापासून अंक आकर्षक बनला आहे. श्री. सहस्रबुद्धे यांचा लेख उत्तम झाला आहे व त्यांनी केलेले आवाहन खरंच मनावर घेण्यासारखे आहे. वसंत धुपकर यांचा 'क्षेपणास्त्र ६८' लेख म्हणजे भारत सरकारच्या मनोवृत्तीचे जळजळीत वास्तव विडंबनाद्वारे सुरेख चितारलेले आहे.

त्यानंतर 'वीरमरण' हे छोटे काव्यसुद्धा असेच वरील मनोवृत्तीचे काव्यात्मक दर्शन आहे. सर्वांना २६/११ मधील आलेला अनुभव ही कविता जागृत करते. तर श्री. अनिल खाडीलकर यांनी आपल्या संग्रहातून 'विज्ञान व अध्यात्म' ह्यांतील २९ वेगळे फरक उत्तमरीत्या दिले आहेत. म्हणजे एखाद्या विषयावर खोलवर अभ्यास करण्यास सुरुवात केल्यावर कितीतरी गोष्टींवर सूक्ष्मरीत्या प्रकाश पडतो. त्याबद्दल खाडीलकर यांना धन्यवाद.

शेवटचा मला भावलेला लेख म्हणजे '६५ वी कला-समाधान'. या लेखाद्वारे सर्वसामान्य वाचकाला अध्यात्माची सूत्री उत्तम रीतीने पटवून दिली आहे.

**- किशोर मुळेकर,** पुणे.

*****

'फेब्रुवारी' महिन्याचे 'संपादकीय' वाचून समाधान वाटले. प्रत्येकाचे जीवन सुखी होण्यासाठी सत्य, प्रेम आणि आनंद या गोष्टींची नितांत आवश्यकता असते. किंबहुना यांच्या गैरहजेरीत मानवाचे जीवन सुखी होऊच शकत नाही. या संपादकीयामध्ये चाकोरीबद्ध नोकरीतून निवृत्तीनंतरचे जीवन सुखी समाधानी होण्यासाठी जी संजीवनी दिलेली आहे, त्याबद्दल मी व माझी पत्नी श्री.शरद शिंगवेकर यांना धन्यवाद देतो.

आपल्या सुनियोजनाबद्दल मी आपला आभारी आहे.

असोसिएशनचे पदाधिकारी व संपादकीय मंडळ यांना मी सुयश चिंतितो.

**- अशोक क. वेसवीकर**

*****

फेब्रुवारी २००९ च्या अंकातील आपले संपादकीय वाचून आमच्यासारख्या V.O.P. (Very Old Person)-VIP, नव्हे म्हणजे आज ८०-८५ वर्षे वयाच्या पुढे असणाऱ्या निवृत्त बंधु-भगिनींना खरे समाधान मिळेल. तसेच संपादकीयात व्यक्त केलेल्या 'मनोबल वाढेल' या शब्दांमुळे तर जणू शतायुषी सेतूही पार करण्याचा मार्ग कसा सुकर होईल हे ही दाखवून दिलेत याबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन.

**- प्र.वा. केळकर**,पुणे
**- अप्पा कुळकर्णी,** मुंबई

# देव तारी त्याला

कधीकधी अशा चमत्कारिक घटना घडतात की त्या घटनांचा अन्वयार्थ लावताना मती कुंठित होते. ही घटना १९८२ च्या डिसेंबर महिन्यातील आहे.

मी त्यावेळी रायगड जिल्ह्यात सुधागड (पाली) या शाखेला रोकड अधिकारी म्हणून काम करत होतो. मला बरेच वेळेला एकात्मिक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत (I.R.D.P) म्हशी, गाई खरेदीसाठी चाकण, मंचर तसेच गोरेगाव-मुंबई येथे जावे लागे. शनिवारी सकाळी जायचे, लाभार्थी शेतकऱ्यांच्या पसंतीने गाई, म्हशी खरेदी करायच्या व संध्याकाळी ५-६ वाजता ट्रकमधून जनावरे व लाभार्थी यांचेसह परतीचा प्रवास सुरू व्हायचा. जनावरे वाहून नेणारे ट्रक हे नेहमीपेक्षा आकाराने मोठे असत. गाडीचा प्रवास अतिशय संथपणे असायचा. त्यामुळे पाली येथे परत यायला जवळ जवळ रात्रीचे ११-१२ वाजायचे. नंतर तेथून पुढे ज्या शेतकऱ्यांच्याकरिता गाई म्हशी आणलेल्या असत, त्यांच्या गावी पोहोचायला जवळ जवळ रात्रीचे १-२ वाजत.

असाच एकदा गाई आणण्यासाठी गोरेगाव-मुंबई येथे गेलो होतो. डिसेंबर महिना होता. जाणवण्याइतपत हवेत गारवा होता. पालीपासून ५-६ कि.मीटरवर आडुळसा नावाचे एक छोटे खेडेगाव आहे. तिथले लाभार्थी होते. आठ गाई खरेदी करावयाच्या होत्या. माझ्याबरोबर लाभार्थी व त्या गावच्या दूध सोसायटीचे श्री. दगडू कदम नावाचे पदाधिकारी होते.

सकाळी ११ वाजता गोरेगाव येथे जाऊन शेतकऱ्यांच्या पसंतीने गाई खरेदी केल्या. सर्व सोपस्कार व्हायला संध्याकाळचे ५-६ वाजले. प्रत्येकाला आपापली गाय दाखवून सर्व गाई ट्रकमध्ये चढविल्या व प्रत्येकाला आपली गाय ट्रकमध्ये असल्याची खात्री करून घ्यायला सांगितले. हे सर्व आटोपल्यावर संध्याकाळी ७ वाजता आमचा परतीचा प्रवास सुरू झाला.

ट्रकमध्ये ड्रायव्हरशेजारी आम्ही २-३ जण बसलो व इतर सर्व पाठीमागे गाई बांधलेल्या होत्या तेथेच बसलेले होते. रात्री १२ च्या सुमारास ट्रक पाली गावात पोहोचला. मी उतरलो व गाडी आडुळसा गावाकडे मार्गस्थ झाली.

दुसरे दिवशी रविवार होता. बँकेला सुटी असल्यामुळे निवांतपणे सकाळी ८ वाजता घरी चहा पीत बसलो असता अचानक श्री दगडू कदम आडुळशाहून आले. चेहरा अगदी चिंताग्रस्त वाटला म्हणून चौकशी केली. ते म्हणाले, ''साहेब एक दुर्दैवी घटना घडली.'' रात्री घरी पोहोचून यांना अजून ६-७ ताससुद्धा झालेले नसताना कसली दुर्दैवी घटना घडली म्हणून मीही चक्रावलो. रात्री आम्ही गावी पोहोचल्यावर गाई उतरवून घेताना सातच गाई होत्या. आठवी गाय गायब ! तेव्हापासून सकाळपर्यंत आम्ही हरवलेल्या गाईचा सर्व ठिकाणी हिंडून शोध घेतला परंतु यश आले नाही. ''गाय जर ट्रकमधून दावे तोडून पाठीमागे खाली पडली असेल तर पाठीमागे बसलेल्या कुणालाही कल्पना आली नाही ?'' श्री. कदम यांना मी विचारले.

तेव्हा श्री. कदम यांनी सांगितले की, ''पाठीमागे बसलेल्या एका माणसाला रात्री केव्हातरी ट्रकच्या बाहेर धाडकन असा मोठा आवाज झाल्याची जाणीव झाली, परंतु अर्धवट झोपेत असल्यामुळे त्याने 'असेल कसला तरी आवाज' म्हणून तिकडे दुर्लक्ष केले.''

घटना ऐकल्यानंतर मनाला फार वाईट वाटले. ज्याची गाय हरवली असेल त्याची अवस्था काय झाली असेल या कल्पनेनेच मन अस्वस्थ झाले. कारण या योजनेखाली जनावरे घेणारे शेतकरी अल्पभूधारकच असायचे व त्यांना सरकारी अनुदानाची चांगली सूट मिळायची. श्रद्धाळू स्वभावाला अनुसरून पालीच्या श्रीबल्लाळेश्वराला नवससुद्धा बोललो.

त्या गावचा परिसर त्यावेळी निबिड अरण्याने व्यापलेला होता. त्या जंगलात दिवसासुद्धा जायला लोक घाबरत. कारण सर्व प्रकारच्या जंगली श्वापदांचाच तेथे वावर होता. गाय जंगलात मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती. कारण ही घटना घडली त्याच्या १५-२० दिवसच आधी मुंबईहून एक १०-१२ तरूणांचा ग्रुप निसर्गभ्रमंतीसाठी त्या जंगलात आला होता आणि भ्रमंती करत असताना त्यातील एक तरुण रस्ता चुकून भरकटत गेला. त्याचा सहकाऱ्यांनी पुष्कळ शोध घेतला. पण व्यर्थ ! त्यानंतर २/३ दिवसांनी जंगली श्वापदांनी अर्धवट खाल्लेला त्याचा मृतदेह मिळाला. त्यामुळे त्या गाईची जिवंत असण्याची आशा सर्वांनी सोडून दिली होती. पण शोध मात्र चालूच ठेवला होता.

अर्थात ही घटना विसरतो म्हटले तरी विसरता येण्यासारखी नव्हती. त्यामुळे बँकेत गेलो तरी डोक्यात हेच विचार घर करून राहिले होते. सोमवार मंगळवार काही बातमी आली नाही.

बुधवारी सकाळी मात्र श्री. दगडू कदम लांबून घरी येताना दिसले. या खेपेला चेहरा हसरा दिसत होता. घरी पाऊल ठेवल्यानंतर अतिशय आनंदाने म्हणाले, 'साहेब गाय परत मिळाली आणि हे तुम्हाला सांगण्यासाठी धावत पळत आलो.' हे ऐकून मला अतिशय आनंद झाला. अक्षरश: श्रीबल्लाळेश्वर पावला असे मला वाटले.

गाय कोठे होती व केव्हा सापडली असे विचारल्यावर कदमांनी जे सांगितले ते आश्चर्यकारकच नव्हे तर कल्पनेपलीकडचे होते. लोकांचा एक गट जंगलात शोध घेत असताना काल संध्याकाळी जंगलात एका ओढ्याकाठी गवतात चरत असताना ती मिळाली. जिथे माणूस एकटा दुकटा जायला घाबरत होता अशा ठिकाणी ती गाय २/३ दिवस फिरत होती व कुठल्याही जंगली श्वापदाचे भक्ष्य न होता हे आश्चर्यकारकच म्हणावे लागेल. 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीची तंतोतंत प्रचिती आली.

**- गजानन जोशी,** कोल्हापूर
भ्रमणध्वनी ९८८१२५९८९५

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

**Form IV (See Rule 8)**
**Statement about the ownership and other particulars concerning**
**SBI Pen.Assn.'s "SAMVAD"**

1. Place of Publication : Pune.
2. Periodicity of Publication : Monthly
3. Printer's Name : Shri. Chandrashekhar Digambar Joshi
   Nationality : Indian
   Address : Shree J Printers Pvt. Ltd., 1416 Sadashiv Peth, Pune - 411 030
4. Publisher's Name : Shri.Ramchandra Narayan Lalingkar,
   Nationality : Indian
   Address : "Anubandh", Bldg. No.B/2, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030
5. Editor's Name : Shri.Krantisen Ramchandra Athawale
   Nationality : Indian
   Address : "Anubandh",Bldg. No.B/2, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030
6. Owner's Name : S.B.I.Pensioners' Association (Mumbai Circle), Pune
   Address : "Anubandh",Bldg. No.B/2, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030

I, Shri.Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, SBI Pensioners' Association (Mumbai Circle), Pune hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Sd/-
R. N. Lalingkar
Date : 25th March 2009 Signature of the publisher

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.